MHRG060011542022

| | |
|---|---|
| दाखल तारीख | ०५/०९/२०२२ |
| नोंद तारीख | ०५/०९/२०२२ |
| निकाल तारीख | १०/०३/२०२६ |
| कालावधी | ०३व, ०६म, ०५दि. |

**<u>पेण येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांच्या न्यायालयात</u>**
(पीठासीन अधिकारी श्रीमती अनुजा अ. काळे)

**नियमित फौजदारी खटला क्र. ११९/२०२२** **निशाणी क्र. ८०**
**सीएनआर क्र. एमएचआरजी०६००११५४२०२२**

महाराष्ट्र शासन,
मार्फत : पोलीस ठाणे पेण,
ता. पेण, जि. रायगड. **...अभियोग पक्ष**

**विरुध्द**

१. अविनाश जगन्नाथ म्हात्रे
वयः ४६ वर्षे,
रा. चिंचपाडा, ता. पेण, जि. रायगड.

२. किशोर ओरसमल जैन,
वयः ४८ वर्षे,
रा. नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड.

३. नरेश मारुती गावंड,
वयः ५४,
रा. चावडीनाका, ता. पेण, जि. रायगड

४. तुषार भगवान मानकवळे,
वयः ३७ वर्षे,
रा. गणपतीवाडी, ता. पेण, जि. रायगड.

५. संजय शंकर पाटील
वयः ५२ वर्षे,
रा. श्रेयसप्लाझा बिल्डिंग,

**...आरोपी**

ता. पेण, जि. रायगड.

६. गजानन लहू मोकल,
वयः ५२ वर्षे,
रा. आमटेम, ता. पेण, जि. रायगड.

७. अच्युत गजानन पाटील,
वयः ३९ वर्षे,
रा. महाडिकवाडी, ता. पेण, जि. रायगड.

८. अशोक वामन वर्तक,
वयः ५८ वर्षे,
रा. वामन निवास, गोदावरीनगर,
ता. पेण, जि. रायगड.

९. राजाराम बाळकृष्ण पाटील,
वयः ६२ वर्षे,
रा. खारपाडा, ता. पेण, जि. रायगड.

१०. श्रीतेज अनिल कदम
वयः २९ वर्षे,
रा. गुरुकृपा सोसायटी, हनुमानआळी,
ता. पेण, जि. रायगड.

११. नंदकिशोर जनार्दन मोकल
वयः ५१ वर्षे,
रा. मोठे वढाव, ता. पेण, जि. रायगड.

१२. पंकज सुरेश शहा
वयः ४५ वर्षे,
रा. चावडीनाका, ता. पेण, जि. रायगड. **...आरोपी**

१३. हिराजी लक्ष्मण चोगले,
वयः ५० वर्षे,
रा. पांडापुर, ता. पेण, जि. रायगड.

१४. दिपश्री दिनेश पोटफोडे,
रा. चैत्रबन रेसिडन्सी, दातारआळी,
ता. पेण, जि. रायगड.

१५. प्रेषिता तुषार ठाकुर,
वयः २५ वर्षे,
रा. दाताराआळी, ता. पेण, जि. रायगड.

१६. महानंदा जयराम तांडेल,
रा. कासु, ता. पेण, जि. रायगड.

१७. नरेश नथुराम सोनावणे,
वयः ४२ वर्षे,
रा. रोडे, ता. पेण, जि. रायगड.

१८. चेतन सतिश मोकल,
वयः २९ वर्षे,
रा. समर्थवाडी, ता. पेण, जि. रायगड.

---

| | | |
|---|---|---|
| श्री. डी. एस. अवसरमोल | : | सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| श्री. महेश देसले | : | आरोपींतर्फे विधीज्ञ |

---

## न्यायनिर्णय

(घोषित तारीख : १०/०३/२०२६)

**०१.** प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७,१४९,१८८, ३३६, ४२७ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३)/१३५ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याकरीता चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :–**

**०२.** दि. २६/०६/२०२२ रोजी १४.०० ते १४.३० वा. सुमारास मौजे पेण प्रांशु बिल्डींग, झिराळ आळी, ता. पेण आरोपी क्र. १ ते १८ यांनी मा. जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील जमावबंदी आदेशाचा भंग करुन एकत्र जमून मा. मंत्री एकनाथ शिंदे व इतर यांचे विरोधात निषेध मोर्चा काढला व त्यानुसार मौजे पेण झिराळ आळी, पेण येथे फिर्यादी यांची पत्नी नामे अंजली वैभव जोगळेकर यांचे शिवसेना महिला आघाडी कार्यालयासमोर एकनाथ शिंदे व इतर यांचे विरोधात घोषणाबाजी केली. तसेच गर्दी जमवून तेथील शिवसेना महिला आघाडीचा लावण्यात आलेला बॅनरवरील एकनाथ शिंदे यांच्या फोटोवर दगड मारले. तसेच सदर बॅनर वर काळे फासण्याचा प्रयत्न करुन बॅनर ओढून फाडून नुकसान केले. त्यामुळे फिर्यादीने पेण पोलीस ठाणे येथे आरोपींविरुध्द तक्रार नोंदविली.

**०३.** सदर तक्रारीच्या अनुषगांने गु.र.क्र. १४२/२०२२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरिक्षक पी.पी. पोकळे यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान साक्षीदारांचे जाबजवाब नोंदवण्यात आले आणि तपास पुर्ण झाल्यानंतर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**०४.** आरोपींना गुन्ह्याचा तपशील **(नि.क्र. ५१)** वाचून दाखविण्यात आला व समजावुन सांगितला. आरोपींनी गुन्हा नाकबुल असल्याचे सांगून संपरीक्षेची मागणी केली. अभियोग पक्षाच्या पुराव्यादरम्यान आरोपींविरुध्द कोणताही सबळ पुरावा न आल्याने नि.क्र.०१ खाली दि. १०/०३/२०२६ रोजी पारीत आदेशानुसार त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**०५.** अभियोग पक्षाचा लेखी व तोंडी पुरावा तसेच आरोपींच्या विधिज्ञांचा युक्तिवाद विचारात घेवुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले, त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे ते येणेप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दि. २६/०६/२०२२ रोजी १४.०० ते १४.३० वाजणेच्या सुमारास मौजे पेण प्राशु बिल्डींग, झिराळ आळी, ता. पेण येथील फिर्यादी यांची पत्नी अंजली वैभव जोगळेकर यांच्या कार्यालयासमोर आरोपींनी समान उद्देशाचे पुरसनार्थ गैरकायद्याची मंडळी जमवून व बेकायदेशीर जमाव जमवून त्याचे सभासद झालात व त्यायोगे सर्व आरोपींनी भारतीय दंड विधान कायदा **कलम १४३ सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला आहे काय? | नकारार्थी. |
| **२.** | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख, वेळ व ठिकाणी सर्व आरोपींनी समान उद्देशाचे पुरसनार्थ गैरकायदयाची मंडळी जमवून दंगा केलात आणि त्यायोगे सर्व | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | आरोपींनी भारतीय दंड विधान कायदा **कलम १४७ सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला आहे काय? | |
| **३.** | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख, वेळ व ठिकाणी सर्व आरोपींनी समान उद्देशाचे पुरसनार्थ जिल्हाधिकारी रायगड यांच्या जमाव बंदी आदेशाचा भंग करून गुन्हा करण्याच्या उद्देशाने गैरकायद्याची मंडळी जमवली व त्यायोगे सर्व आरोपींनी भारतीय दंड विधान कायदा **कलम १८८ सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला आहे काय? | नकारार्थी. |
| **४.** | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख, वेळ व ठिकाणी परस्पर संगनमत करुन बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी यांची पत्नी यांची जीवीत आणि व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणारी कृती केली व त्यायोगे सर्व आरोपींनी भारतीय दंड विधान कायदा **कलम ३३६ सह कलम १४९** प्रमाणे गुन्हा केला आहे? | नकारार्थी. |
| **५.** | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख, वेळ व ठिकाणी समान उद्देशाचे पुरसनार्थ फिर्यादीची पत्नी शिवसेना महिला आघाडीचा लावण्यात आलेला बॅनर एकनाथ शिंदेच्या फोटोवर दगड मारून बॅनरवर काळे फासण्याचा प्रयत्न करुन बॅनर ओढून फाडून नुकसान केले व त्यायोगे सर्व आरोपींनी भारतीय दंड विधान कायदा **कलम ४२७ सह कलम १४९** प्रमाणे गुन्हा केला आहे? | नकारार्थी. |
| **६.** | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख, वेळ व ठिकाणी सर्व आरोपींनी समान उद्देशाचे पुरसनार्थ मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी साो. रायगड–अलिबाग | नकारार्थी. |

यांचे प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग केला व त्यायोगे तुम्ही महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम **३७(१)(३)/१३५** प्रमाणे गुन्हा केला आहे?

**७.** आदेश काय? — अंतिम आदेशाप्रमाणे.

## <u>कारणमिमांसा</u>

**०६.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी केवळ एक साक्षीदार फिर्यादी वैभव मुकुंद जोगळेकर **(नि.क्र. ७६)** यांचा पुरावा नोंदविला.

**<u>मुद्दे क्र. १ ते ६ करिता</u>** :–

**०७.** मुद्दे क्र. १ ते ६ हे एक संलग्न असल्याकारणाने घटनेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते एकत्रितरित्या घेण्यात येत आहेत.

**०८.** फिर्यादी साक्षीदार क्र.१ वैभव मुकुंद जोगळेकर **(नि.क्र. ७६)** याच्या पुराव्यात असे आले की, घटना केव्हा घडली होती हे त्यांना आठवत नसल्याचे सांगितले. ते घटनेबाबत तक्रार दिली होती किंवा कसे हे त्यांना आठवत नसल्याचे सांगितले. त्यांना तक्रार दखविण्यात आली. त्यातील मजकूर खरा आहे किंवा कसे हे त्यांना सांगता येणार नसल्याचे सांगितले. परंतु त्याने सदर तक्रारवरील त्याची स्वाक्षरी मात्र ओळखली.

**०९.** फिर्यादीने अभियोग पक्षांच्या कथनांना सहकार्य न केल्यामुळे, त्याला भारतीय पुरावा कायदयाचे कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्यात आले. त्याने फिर्यादमधील अधोरेखांकीत भाग 'अ' मधील मजकूर तक्रारमध्ये का लिहिला याचे कारण तो सांगू शकत नसल्याचे त्याने सांगितले. याउलट, त्याने त्याच्या उलटतपासात आरोपींसोबत न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली असून प्रस्तुत प्रकरणात त्याला कोणतेही स्वारस्य

नसल्याचे मान्य व कबूल केले आहे. तसेच, आता त्याला आरोपींविरूध्द प्रस्तुत प्रकरणात इतर कोणतेही साक्षीदार तपासायचे नाहीत असे देखील त्याच्या उलटतपासात मान्य व कबूल केले आहे.

**१०.** फिर्यादी हा अभियोग पक्षाचा महत्वाचा साक्षीदार आहे. परंतु, फिर्यादीने त्याच्या साक्षीदरम्यान, त्याच्या फिर्यादमधील कोणताच मजकुर आपल्या पुराव्यात सांगितलेला नाही. फिर्यादीने साक्ष देताना दि. २६/०६/२०२२ रोजी दुपारी २.०० ते २.३० वा. दरम्यान फिर्यादीची पत्नी शिवसेना महिला आघाडी पेण शहर अध्यक्ष कार्यालयासमोर आरोपींनी एकत्र जमून व गर्दी करुन पेण, पोलीसांशी हुज्जत घालून, सदर कार्यालयाचे समोर लावलेल्या बॅनवर काळे ऑईल फेकण्याचा प्रयत्न केले असल्याचे सांगितले नाही. तसेच सदर कार्यालयाचे बॅनरवर दगड व विटा फेकून मारल्याचे व बॅनर ओढून फाडून त्याचे नुकसान केल्याचे इ. बाबी स्पष्टपणे नाकारलेल्या आहेत. त्यामुळे आरोपींनी नेमका कोणता व कशाप्रकारे गुन्हा केला याबाबत संभ्रम निर्माण होतो. साक्षीदरम्यान फिर्यादीने त्याच्या व आरोपींमध्ये तडजोड झाल्याचे सांगितल्याने अभियोग पक्ष आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत करु शकलेला नाही.

**११.** फिर्यादीच्या साक्षीपुराव्यावरुन असे दिसून येते की, त्याच्यामध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे, करीता त्याने साक्षीपुराव्यात काही सांगितलेले नाही. तसेच तक्रारमधील मजकुराबाबत देखील त्याला काही माहिती नसल्याचे सांगितले. फिर्यादी हा त्याच्या फिर्यादमधील मजकुरच शाबीत करु शकलेला नाही. त्यामुळे उपलब्ध पुरावा आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत करण्यासाठी पुरेसा नाही. त्यामुळे मी या निष्कर्षास पोहचले की, अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द ठेवलेले आरोप निसंशयपणे सिध्द केलेले नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ६ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ७ करीता</u>** :–

**१२.** वरील निष्कर्ष पाहता सर्व आरोपी हे ठेवलेल्या आरोपांतून निर्दोष मुक्त होण्यास

पात्र आहे. त्यामुळे आरोपींनी फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे जामीन देणे गरजेचे आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ ते १८ यांची भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, १८८, ३३६, ४२७ ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम १४९ आणि महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम ३७(१)(३)/१३५ च्या दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल दोन तुकडयामध्ये फाटलेले एक बॅनर, हातात मावतील असे दोन दगड, लहान मोठया आकाराचे विटांचे तीन तुकडे यांचा अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

४. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक पेनड्राइव्हची अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

५. आरोपींकडुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चा जामीन घ्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयामध्ये आदेशीत व उद्घघोषित.)

ANUJA ANIL KALE
Digitally signed by ANUJA ANIL KALE
Date: 2026.03.11 10:10:25 +0530

पेण
दिनांक – १०/०३/२०२६

(**श्रीमती अ.अ.काळे**)
न्यायदंडधिकारी प्रथमवर्ग, पेण.